# शिक्षणाच्या प्रश्नांकडून पर्यायी शिक्षणाकडे

आपले आजचे शिक्षण असमाधानकारक आहे, असे वेगवेगळया कारणाने, पण प्रत्येकजण म्हणत असतो. शिकणाऱ्यांना शिकताना त्यात रस वाटत नाही; शिकल्यानंतर जीवनात ते उपयुक्त ठरत नाही; असा अनुभव सार्वत्रिक आहे. शिक्षणाने व्यक्तीला आयुष्यभरासाठीची ज्ञान, मूल्ये, कौशल्ये आणि प्रश्न सोडविण्याची ताकद द्यायची असते. आजचे शिक्षण हे असे नाही, अशी भावना जर सार्वत्रिक असेल, तर सार्वत्रिकरित्याच ते नाकारले गेले पाहिजे. त्यासाठी राज्यव्यापी आणि राष्ट्रव्यापी आंदोलन घडले गेले पाहिजे.

शिक्षणाविषयी, त्यांतील उणिवांविषयी, त्यात वेळोवेळी आढळून येणाऱ्या गैरव्यवहारांविषयी अनेक माणसे पोटतिडिकीने बोलत असतात. त्यात नेत्यांपासून संबंधितांपर्यंत सारे असतात. शिक्षणाविषयी कळकळीने चर्चा झडत असतात. दोनशे वर्षांपूर्वीच्या मेकॉलेला, आणि तो ज्या साम्राज्याच्या प्रतिनिधी होता त्या ब्रिटिश साम्राज्याला, त्यांच्या शिक्षणविषयक धोरणाला, बारकावे मोडून दोष दाखविणारे, चर्चा -परिसंवादांमधून टाळया घेतात. परंतु असा इतिहासावर दोषारोप ठेवून भविष्याकाळ घडवता येत नाही. एकीकडे, असलेले शिक्षण निखालसपणे वाईट आहे, असा निर्वाळा द्यायचा आणि दुसरीकडे याच शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आग्रह धरायचा, ही विसंगती शिक्षण -परिवर्तनाच्या शक्यता दुरावणारीच आहे.

शिक्षणाची प्रकृती वाईट आहे आणि दिवसेंदिवस ती अधिक खराब होत चालली आहे, ही वस्तुस्थिती एकदा स्वच्छ मनाने स्वीकारली पाहिजे. मग तिची शास्त्रशुद्ध तपासणी केली पाहिजे. सापडलेले दोष गंभीर असतील तर शिक्षणव्यवस्थेलाच ऑपरेशन टेबलवर आडवे घेतले पाहिजे. वर्तमान परिस्थितीचे खोलवरचे विश्लेषण करूनच नेमके निर्णय घेतले पाहिजेत ; घेतलेले निर्णय कठोरपणे अमलात आणण्याचे धैर्य दाखविले पाहिजे. सरकार हे करणर नाही. सरकार नामक अशी ही संस्था स्वभावतःच स्थितिप्रिय असल्यामुळे तिला परिवर्तनाची वेगवान दिशा पकडताच येणार नाही. हे ऑपरेशन संघटित समाजालाच करावे लागेल.

साऱ्या शिक्षणाचे एकसंघ असे रूप एकदा डोळयांसमोर ठामपणे उभे केले पाहिजे. असे केल्याने त्याचे साकलिक प्रश्न आपल्यासमोर मांडता येतील. असे करून पाहावे, तो काही व्यापक प्रश्न साऱ्या शिक्षणव्यवस्थेला वेढून बसलेले दिसतात.

शिक्षणविषयी सार्वत्रिक असमाधान तर आहेच. किंबहुना म्हणूनच तर तो नाकरण्याचा आणि त्याच्या जागी पर्यायी शिक्षण उभे करण्याचा परिवर्तनवादी विचार आता होऊ लागला आहे. पण, हा एकच प्रश्न नाही. आणखीही काही मोठे प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, शिक्षण सर्वांनाच मिळत नाही. शिक्षणाची संधी आजही अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कारणांमुळे सर्वांना सामावून घेत नाही. शिक्षणवंचितांचा मोठा वर्ग असणारा असा आपला देश आहे. ज्यांना शिक्षणाची संधी मिळते त्यांना ती समानतेने मिळत नाही, हे घटनेच्या जाहीरनाम्यात समतेचा उद्घोष करणाऱ्या राष्ट्रातील सूर्यप्रकाशाएवढे मोठे सत्य आहे. एकेकाळी सामाजिक वर्गवारीनुसार शिक्षण ही विक्रेय वस्तू म्हणूनच ठरवली आणि सरकारी शिक्षणखात्याचे रूपांतर मानव संसाधान खात्यात केले गेले, त्यामुळे शिक्षणाचा प्रत्यक्ष संबंध ग्राहकांच्या खरेदीशक्तीशी बांधला गेला. बाजार

हा नेहमीच असमता निर्माण करतो, हे आपण याबाबतीत ध्यानात घ्यायला हवे आहे. दर्जाची समानता हे अजूनही क्षितिजाच्या पलीकडील ध्येय आहे.

आणखीही काही गंभीर प्रश्न वास करून आहेत. आपले राष्ट्र हे लोकशाही राष्ट्र म्हणून मानाने मिरवत आहे. समतेबरोबरच स्वातंत्र्याच्या उद्घोषित पायावर ते उभे आहे. परंतु या देशात ज्याला जे शिक्षण घ्यायचे आहे, त्याला ते घेता येईलच याची ग्वाही मात्र नाही. वैद्यकीय शिक्षणासारखी उगीचच हुशारांची मक्तेदारी मानलेली, गरजेच्या मानाने, जाणून - बुजून अपुरी पुरवठा ठेवलेली शिक्षणव्यवस्था हे याचे ढळढळीत उदाहरण आहे. अगदी शाळा - कॉलेजांमधून विषयांच्या निवडीबाबतच्या निरर्थक प्रवेशबंदीच्या व्यवस्थांपासून तो खेडयांमधून शासकीय वाईट शाळांना पर्याय न ठेवण्यापर्यंत,

शिकण्याच्या स्वातंत्र्याची पायमल्ली होत आहे. चांगले शिक्षण म्हणजे काय असते, याचा पालकांना व संबंधित समाजाला पत्ताच लागणार नाही, याची काळजी घेतल्यामुळे, खेडयांतून मिळणारे वाईट शिक्षण हेच 'शिक्षण' समजले जाते आणि शहरांतील अशास्त्रीय शिक्षण हेच 'चांगले शिक्षण' समजले जात आहे. त्यामुळे साहजिकच चांगल्या नि शास्त्रीय शिक्षणाची मागणीच कधी समाजाकडून येत नाही. समाज अशा शास्त्रोक्त चांगल्या शिक्षणाबाबत अजून उदासीनच आहे. हे तसे साहजिकच आहे. परंतु शिक्षणाचे सर्वाधिकार हाती असूनही स्वतः सरकारही चांगल्या शिक्षणाबाबत विलक्षण उदासीन असावे, ही बेजबाबदारपणाची गोष्ट आहे.

खरा प्रश्न असा आहे, की आपला समाज हा पूर्णतः प्रौढकेंद्री समाज आहे. देशातील एकतृतियांश संख्या म्हणजे सुमारे तीस -पस्तीस कोटी लोकसंख्या ही, चौदा -पंधरा वर्षांपर्यंतच्या मुलांची आहे. परंतु समाजात मानाचे स्थान नाही. त्यांच्यासाठी नेमकेपणाने विकास - विषयक धोरण नाही. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची हेळसांड सहजपणे खपवून घेतली जाते. संघटित होऊन आपला आवाज उठविण्याची ताकद नसलेला असा हा वंचित घटक आहे; आणि शासनासहित सारा प्रौढ समाज मुलांना दुय्यमच लेखतो आहे.

आजच्या शिक्षणाचे जे काही स्वरूप आपल्यासमोर दाखल आहे, त्याची कारणे ब्रिटीशकालीन अथवा ब्रिटीशपूर्व परंपरेत आढळतील. पण ते फारसे महत्त्वाचे नाही. कारण देश राजकीयदृष्टया स्वतंत्र झाला, तेव्हा शिक्षणव्यवस्थेत व पद्धतीत परिवर्तन करण्याची एक मोठी संधी आपल्याला प्राप्त झाली होती, आपण तसे काही त्या वेळी करू शकलो नाही, किंवा करू धजलो नाही, हा दोष सर्वस्वी आपला आहे.

स्वातंत्र्योत्तर देशामध्ये अनेक गोष्टी बदलल्या. शेतीकडून उद्योग - कारखान्यांकडे आणि आता माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीकडे आपण वळलो. बदलत्या काळानुसार शिक्षणाकडूनच्या अपेक्षा बदलत गेल्या, पण त्यादिशेने पुढे सरकण्यात आपण कमी पडलो असू, तर तो दोष आपलाच आहे. स्वातंत्र्योत्तर अर्धशतकाचा काल, ना शिक्षणाचा आशय बदलू शकला ना पद्धती; ना व्यवस्था बदलू शकला ना वळण. एक प्रकारे गतिहीन अशा शिक्षणाकडे आपण ना नवतंत्रांच्या अंगाने पाहू शकलो ना नवशास्त्रीय संशोधनाच्या अंगाने. आपण स्वतःची अशी, देशकाल परिस्थितीनुसार लवचिक असणारी शिक्षणपद्धती उभीच करू शकलो नाही. आपण हे कामं कधी महत्त्वाचे मानलेच नाही. अनेक आयोग नि समित्या वरवरचे उणे- अधिक उपाय सुचवीत राहिल्या, संपूर्ण परिवर्तनाचा विचार पुढे येऊच दिला नाही.

गांधीजींना एक ग्रामस्वराज्याचे स्वप्न पाहिले, त्याला अनुषंगून ‘बुनियादी शिक्षणा’ची मूलतः क्रांतिकारक योजना देशापुढे ठेवली. त्यांच्या सहकाऱ्यांनी ती प्रायोगिक स्वरूपावर काही काल प्रभावीपणे राबवली. पण तिचे यशापयश जोखण्यापूर्वी सामाजिक नि सरकारी उदासीनतेची ती बळी ठरली. अशाप्रकारे पुनश्च कधी नवी स्वप्ने, नवी ध्येये घेऊन नवसमाजरचनेचा विचारच कुणी मांडला नाही. त्यामुळे शिक्षणाला काही वेगळया कामाचे आव्हानही मिळाले नाही. तसे राष्ट्रीय नेतृत्त्वही पुढे उभे ठाकले नाही.

शिक्षणविषयी सार्वत्रिक असमाधान असेल तर त्याची घडी नव्याने बसवायला हवी. त्यासाठी सांघिक प्रयत्नांची कास धरायला हवी. जे आज आहे ते उपयुक्त ठरत नसेल, तर धीटपणे टाकून दिले पाहिजे. उदाहरणार्थ, देशातील बहुतांशी शिक्षण सरकारी मालकीचे आहे. असे शिक्षण कमकुवतच राहत असेल, तर पहिला आघात शिक्षणावरील शासकीय सर्वाधिकारांवर करायला हवा. शिक्षण शासनाच्या मगरमिठीतून सोडविले पाहिजे. शासनाला शिक्षण कळते या भ्रमात राहून आपण वेळ वाया घालवता कामा नये. शिक्षण आधी स्वतंत्र केले पाहिजे आणि मग त्यातही परिवर्तनाची भाषा केली पाहिजे. शिक्षण हे पूर्णतः स्वायत्त असले पाहिजे. सरकारचा त्याच्याशी धोरणविषयक अथवा कायदेशीर संबंध राहील, पण व्यवहार मात्र पूर्णतः सरकारमुक्त असेल. शिक्षण सरकारी नाही म्हणजे खाजगी असेल का? तशी आवश्यकता आहे असे नाही. शिक्षणाचे सरकारीकरण आणि खाजगीकरण. दोन्हींना तिसरा पर्याय सामाजिकीकरणाचा असू शकतो. बालशाळा, प्राथमिक शाळा,माध्यमिक शाळा, महाविद्यालये इत्यादी प्रत्येक वरच्या पायरीचे शिक्षण, वाढत्या भौगोलिक प्रदेशांना, म्हणजे त्यातील समाज घटकांना, आपल्या अखत्यारित ठेवता येणार आहे. त्यामुळे त्यांच्या व्यवहारांवर अंकुश ठेवता येणार आहे.

परंतु हा बदल केवळ व्यवस्थेचा बदल झाला. तो करणे अपरिहार्यच आहे, पण पुरेसा नाही. शिक्षण ही शास्त्रबद्ध अशी बाब आहे तिचा आधार विशिष्ट शास्त्रीय विचारसरणी हा आहे. आजवरचे शतकभराचें सारे शिक्षण हे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालातील मानसशास्त्रीय संशोधनावर आधारलेले आहे. या संशोधनांती स्थिर झालेल्या विचारसरणीस वर्तनवादी विचारसरणी असे म्हणतात. तत्कालीन मानसशास्त्रात, शास्त्रज्ञांनी कुत्र्यांवर, उंदरांवर, मांजरांवर किंवा कबुतरांवर त्यांच्या वर्तनाचा अभ्यास करणारे आणि वर्तन बदलायला भाग पाडणारे असे काही प्रयोग केले. या प्रयोगाचे निष्कर्ष सरळपणे माणसाला लागू करण्यात आले. आणि मग, शिक्षण म्हणजे वर्तनातील अपेक्षित बदल अशी व्याख्या रूढ होऊन वर्तनवाद जगभराच्या शिक्षणव्यवस्थेवर स्वार झाला. त्यात घोकंपट्टी आली, शिक्षा,शिस्त परीक्षा आणि बक्षिसे आली. काहीतरी उत्तेजन देऊनच माणसाचे वर्तन बदलता येते अशी समजूत स्थिर झाली.

आजचे प्रचलित शिक्षण हे असे वर्तनवादी विचारसरणीवर आधारलेले आहे. ते फारसे 'उत्पादक' नाही हे लक्षात येऊनही आपण त्यात बदल करीत नाही ; याचे कारण असे आहे की, विसाव्या शतकाच्या मध्यापासून अखेरीपर्यंतच्या अर्ध शतकात (भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या अर्धशतकाचाही हाच कालावधी आहे!) शिक्षणशास्त्राला आधारभूत असलेल्या मानसशास्त्रात आणि प्रगती आपण विचारात घेतलेली नाही. आता ती आधाराला घेऊन शिक्षणाची नवमांडणी करायला हवी. अशाप्रकारची शिक्षणाची नवमांडणी करता येईल एवढे साहित्य विविध शास्त्रांतील संशोधनांनी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने आपणास प्राप्त करून दिले आहे. तंत्रज्ञान आणि शास्त्रज्ञान घालून शिक्षणाकडे अगदी वेगळया अंगाने पाहणे आता शक्य झाले आहे.

यांचा मेळ

उदाहरणार्थ, मानसशास्त्राने, मूल शिकते कसे (माणूस शिकतो कसा) त्याच्या ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया कशी असते यावंर बराच प्रकाश टाकला आहे. जन्मल्यापासून अखेरपर्यंत विविधांगी अनुभव घेत जाणे आणि त्याचे रूपांतर करीत जाणे ही व्यक्तिगत पातळीवरील प्रक्रिया झाल्यापासून, त्याच्या अभ्यासाचे, ज्ञान उत्पत्तीशास्त्राचे नवे क्षेत्र निर्माण झाले आहे. हे शास्त्र हा एक भावीकाळातील शिक्षणशास्त्राचा बळकट पाया ठरू शकतो.

संगणकीय तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मानवी मेंदूविषयीची, म्हणजे त्याच्या रचनेची आणि कार्यपद्धतीची, खूप नवी माहिती उपलब्ध झाली आहे. जन्मल्यापासून माणूस शिकत कसा जातो, तो शिकत असताना मेंदूमधील विदयुत व रासायनिक क्रिया कसकशा घडून येतात यांचे बरेचसे भान या माहितीमुळे आले आहे. महत्त्वाची गोष्ट अशी, की मेंदूचे वर्णन आता ‘शिकण्याचा अवयव' म्हणून केले जाते. साहजिकच, शिकणे हेच खरे जर का प्रामुख्याने मेंदूचे कार्य असेल, तर सारे शिक्षणच आता मेंदअभिमुख असे असावे लागेल. ते निसर्गाला धरून असेल. मेंदूविषयक संशोधनातून आणखीही एक माहिती मिळाली आहे. मुलाच्या शिकण्याच्या वयात कोणकोणत्या व्यावहारिक बाबी मेंदू अनुकूल असतात, व त्या जाणीवपूर्वक करायच्या असतात यांचे बऱ्यापैकी ज्ञान झाले आहे. त्यामुळे या सर्वांना सामावून घेणारी मेंदूआधारित शिक्षणाची व्यवस्था निर्माण करता येते. आपण तसे न करणे हे विद्यार्थ्यांच्या अहिताचे ठरणार आहे.

मेंदूसंशोधनाने क्रांतिकारक बदल मानवी ज्ञानक्षेत्रांमध्ये घडवून आणायला सुरुवात केली आहे. 'बुद्धिमत्ते'  च्या बाबतीत आलेल्या नवविचारांमध्ये त्याचा प्रत्यय येतो. बुद्धिमत्ता ही एक सर्वसाधारण अशी, कुणाला कमी, कुणाला जास्त, बहुधा आनुवंशिक आणि बदलता न येण्य सारखी अशी एक क्षमता आहे, असे मानून आजवरच्या शिक्षणाची रचना केली गेली आहे. मात्र आता असे लक्षात आले आहे (आणि त्याचे नवसिद्धांतात नि त्यावर आधारित अशा व्यवहारांत रूपांतर झाले आहे! ) की, बुद्धिमत्ता ही एक नसून अनेक आहेत आणि प्रत्येकालाच या विविध बुद्धिमत्तांचा विशिष्ट असा पट असतो. प्रत्येकाचा पट मात्र भिन्न-भिन्न असतो. आठ प्रकारच्या वेगवेगळया बुद्धिमत्ता आणि त्यांची मेंदूमधील विविध केंद्रे ज्ञात झाली आहेत. या नवज्ञानाच्या आधारे शिक्षणरचना तपासली तर असे दिसून येते की, ती फक्त दोनच, म्हणजे भाषिक नि गणिती -तार्किक, बुद्धिमत्तांना न्याय देणारी आहे, इतर बुद्धिमत्तांना अशंतः किंवा पूर्णतः वगळणारी आहे. परिणामतः इतर बुद्धिमत्ता असणाया व्यक्तींनाच ती वगळणारी ठरते आहे. असे असेल तर ही अन्यायकारक रचना त्वरेने बदलण्याची जबाबदारी आपण घ्यायला हवी. विविध बुद्धिमत्तांना सामावून घेणारी अशी शिक्षरचना घ डवावी लागेल. त्या अंगाने विचार केला तर कदाचित शालेय आणि त्यांतील वर्गपद्धतीवरच आघात होईल. पण, शिकणाऱ्याच्या हितासाठी हा धोका आपण पत्करला पाहिजे. मेंदूआधारित शिक्षण हे शिकणाऱ्याला, शिक्षणरचनेत मध्यवर्ती स्थान देणारे आहे. प्रत्येक जण आपल्या शिक्षणाची रचना आपणच करीत असतो. इतरांचे त्यासाठी साहाय्य घेत असतो. पण जे शिकायचे ते तो स्वतः शिकत असतो. त्यामुळे शिकणाऱ्याच्या सोयीची अशा आजच्या शिक्षणरचनेचे परिवर्तन शिकणाऱ्याच्या सोयीची असे करण्याशिवाय गत्यंतर नाही. शिकणे ही गोष्ट व्यक्तिनिष्ठच असते. त्यामुळे शाळांमधून शिक्षकाने एकच शिक्षण सर्वांसमोर ठेवण्याची ( घेणाऱ्यांनी ते घेवो वा न घेवो! ) पद्धती पालटून, त्याजागी प्रत्येकाने स्वतःहून शिकण्यासाठी सोयी, सवलती आणि संधी उपलब्ध करून देणारी अशी रचना घडवावी लागणार आहे. या प्रकारच्या शिक्षणामागील तात्त्विक

विचारसरणीला 'रचनावादी विचारसरणी' असे संबोधले जाते, थोडक्यात असे, की प्रचलित वर्तनवादी शिक्षणाकडून रचनावादी शिक्षणाकडे आपल्याला वळायचे आहे.

गतिरूद्धतेकडून गतिमानतेकडे अशी शिक्षणविषयक वाटचाल आपण करायची आहे. जीवन उद्याचे आणि शिक्षण कालचे, या कोंडीत सारे शिक्षण अडकले आहे. बदलत्या पिढीला स्वतःचे बदलते शिक्षण हवे असते, गरजेचे असते. पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट वेगळी होती. त्याकाळी, सामान्यतः विशी- पंचविशी पर्यंत शिकून मिळविलेली ज्ञान -माहितीची पूंजी आयुष्यभरासाठी पुरत होती. कारण मानवी आयुष्याचा वेग फार नव्हता. आज शिक्षणाने जर विशिष्ट ज्ञानांचा साठी विद्यार्थ्यांना द्यायची गोष्ट केली, तर तो साठा त्यांच्या आयुष्यभराच्या ज्ञानाची गरज भागविणार नाही. त्यामुळे ज्ञान देणारी शिक्षणव्यवस्था बंद करून, आता विद्यार्थ्यांना ज्ञान मिळवायला शिकवणारी शिक्षणव्यवस्था निर्माण करावी लागेल. अशी व्यवस्था ही अपरिहार्यपणे स्वतःहून शिकण्याची, स्वतः अनुभव घेऊन त्या अनुभवांचे रूपांतर स्वतःच्या ज्ञानात करणारी, अशीच आहे, हे मेंदूविषयक संशोधनाने सिद्ध केले आहे. अशा त-हेच्या शिक्षणाकडे वळविणारे एक नवे शास्त्रच अगदी अलीकडच्या काळात उदयाला आले आहे. त्याला 'आकलनविषयक मज्जाशास्त्र' असे म्हण तात. विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळातील मानसशास्त्रीय बैठकीवरील वर्तनवादी शिक्षणप्रणालीचे रूपांतर करून तिला आकलनविषयक मज्जाशास्त्राच्या आधारावर उभे करणे, याला शिक्षणातील क्रांती असे म्हणता येईल.

गांधीजींचा जीवनशिक्षणाचा विचार आजच्या आकलनविषयक मज्जाशास्त्राशी सुसंगत असा आहे. आपणही शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट ‘जीवनशिक्षण’ हेच मानणार असू, तर जीवनशिक्षणाच्या तिरंगी रूपाकडे आपण जाऊन पोचू. एक म्हणजे, शिक्षण जीवनासाठी असावे, दुसरे ते जीवनाबरोबर (बदलत) असावे, आणि तिसरे म्हणजे, शिक्षण हे जीवनातून व्हावे. हा तिसरा मुद्दा आपल्याला शिक्षणाच्या पद्धतीकडे घेऊन जातो. आकलनविषयक मज्जाशास्त्र त्याचा आग्रह धरते आहे. त्या अनुभवाधारित शिक्षणपद्धतीला लागणाऱ्या अनुभवांच्या पुरवठा जीवनाकडूनच प्रत्यक्षपणे मिळणारा असतो. प्रचलित शिक्षण निरूपयोगी नि असमाधानकारक होण्याचे मुख्य कारण आहे. त्यामुळे, जीवनाकरवी शिक्षणाची गांधीजींची सूचना, निश्चितच ही दरी भरून काढणारी आणि तशी ती पुनश्च निर्माण होऊन देणारी अशी ठरू शकेल. ही सारी शिक्षणपरिवर्तनाची नवी दिशा एका पर्यायी शिक्षणव्यवस्थेला जन्म देऊ शकेल, याची मला खात्री वाटते.

या नवव्यवस्थेत, बालशिक्षण म्हणजे सर्वांत लहान मुलांचे शिक्षण सर्वोच्च स्थानी असेल. ते अतिशय गंभीरतेने नि अत्यंत काटेकोर पद्धतीने करावे लागेल. शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून नवव्यवस्थेचा पाया उभारता येईल. साधारणपणे तीन वर्षांपर्यंतच्या वयाचा 'कुटुंबपातळीवरील बालशिक्षण' म्हणून विकास करावा लागेल. पालकशिक्षण हा त्याचा अविभाज्य भाग असेल. तीन ते आठ वर्षांपर्यंतचे वय हे बालकाचा मेंदू तयार होण्याचे, म्हणून अत्यंत संवेदनशील असे वय मानले पाहिजे. या पाच वर्षांचे शिक्षण हे खरे 'पायाभूत शिक्षण' म्हणून विकसित करावे लागेल. मुलांचे वैयक्तिक अनुभवविश्व विस्तारणे, भाषाशिक्षणाला प्राधान्य देणे आणि सामाजिक मूल्यांची रूजवण करणारे वातावरण पुरवणे, असा या कालावधीतील शिक्षणाचा आशय असेल. पुढील औपचारिक शिक्षणाचा हा खंबीर पाया असेल. त्यानंतर आठ ते पंधरा वर्षांचा काल हा विविध बुद्धिमत्तांच्या अंगाने जीवनशिक्षणाची मांडणी करून, ज्ञान मिळवायचे कसे याची कौशल्ये आणि प्रश्न सोडविण्याची क्षमता यांचा विकास करणारे ठरेल.

मला वाटते, आजच्या पदवीपातळीपर्यंतच्या शिक्षणाची तयारी हे केवळ सात वर्षांचे शिक्षण करू शकेल. पुढची शिक्षणाची सर्व दारे सर्वांनाच मोकळी ठेवावीत. प्रत्येक जण आपल्या गरजेनुसार, आपल्या कलाने आणि आपल्या वेगाने, काम करून अथवा पूर्णवेळ शिक्षणासाठी देऊन शिक्षण घेऊ शकेल. विद्यापीठीय शिक्षणाचा बंदिस्तपणा यासाठी अर्थातच, मोडीत काढावा लागेल. मला मेडिकलचा दोन वर्षांचा डिप्लोमा आणि बरोबरीने मराठी साहित्याचाही दोन वर्षांचा डिप्लोमा घेऊन कार्यरत होता येईल. किंवा एक वर्षांचा मेडिकलचा सर्टिफिकीट कोर्स करून समाजकार्याचा असाच एक दोन वर्षांचा अभ्यास करून कार्यात उतरता येईल. अल्पकालीन अभ्यासक्रमांपासून ते दीर्घकालीन विशेषज्ञांसाठीच्या अभ्यासक्रमांपर्यंतची रचना करता येणे सहज शक्य आहे. स्पर्धा, वर्गपद्धती आणि त्याचबरोबर सर्वच स्तरांवरची बंदिस्तता या साऱ्या गोष्टी माणसाला खऱ्याखुऱ्या शिक्षणापासून वंचित करणाऱ्या आहेत. पण त्या टाकून देण्याचे धैर्य, एक सजग म्हणून आपण दाखवीत नाही, हीच खरी अडचण आहे.

प्रचलित शिक्षणव्यवस्था नाकारण्याचे आणि त्याजागी पर्यायी व्यवस्था उभी करण्याचे राज्यव्यापी आणि राष्ट्रव्यापी आंदोलन यासाठी उभे करायचे आहे. शिक्षणस्वातंत्र्याचे हे आंदोलन असेल. व्यक्तीच्या शिक्षणस्वातंत्र्याचे हे आंदोलन असेल.

परंतु, शिक्षणातून निर्माण झालेला गुलामांचा वर्ग या आंदोलनाचा पाईक कसा होईल, याकडे विचारवंतानी लक्ष पुरवले तरच असे काही घडेल, त्वरेने, घडेल असे आपण मानू या.

❖